खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०६ | अंक : २८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.११ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## राजुऱ्यातील गोळीबार हत्याकांडाला मोक्काचा दणका !

### राजुरा पोलीस ठाणे हद्दीत पहिल्यांदाच मोक्का कारवाई




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** जिल्ह्यातील राजुरा शहरात भरदिवसा गोळीबार करून करण्यात आलेल्या खळबळजनक हत्याकांडाची राजुरा पोलिसांनी गंभीर दखल घेतली असून, या प्रकरणातील सराईत गुन्हेगारांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा,१९९९ (मोक्का)अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. राजुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत पहिल्यांदाच मोक्का कायद्याचा वापर करण्यात आल्याने या कारवाईला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.३० ते ६ वाजेदरम्यान सोमनाथपूर वार्ड, राजुरा येथील रहिवासी विनोद ऊर्फ पापा जनार्धन जाधव हे कोर्टासमोरील किरणकुमार साईला यांच्या नारळ पाण्याच्या दुकानाजवळ मित्रांसोबत बसले होते. यावेळी इंदिरानगर, राजुरा येथील आरोपी करण दुर्गराज मेकलवार आणि करण दीपक बावीस्कर हे तोंडाला दुपट्टा बांधून दुचाकीवरून तेथे आले. यातील करण दीपक बावीस्कर याने जवळील पिस्तुलातून विनोद ऊर्फ पापा जाधव यांच्यावर गोळीबार केला. या हल्ल्यात जाधव यांची हत्या झाली.

या प्रकरणी राजुरा पोलीस ठाण्यात अप.क्र.६९५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस)कलम १०३(१),३(५)तसेच भारतीय हत्यार कायद्यातील कलम ३,२५,२७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला .

तपासात कट रचणाऱ्यांसह पाच जणांवर कारवाई :

गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक नितीन चिंचोळकर यांच्या नेतृत्वाखाली वेगाने करण्यात आला. तपासादरम्यान प्रत्यक्ष गोळीबार करणाऱ्या आरोपींसोबतच गुन्ह्याचा कट रचणे, अपप्रेरणा देणे तसेच प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष मदत केल्याच्या आरोपा वरून परवेज सरवर शेख, कार्तिक उमेश खामनकर आणि सौरभ ऊर्फ भुर्जी उमेश खामनकर यांना अटक करण्यात आली. आरोपींकडून पोलिसांनी तीन अग्नीशस्त्रे, तीन रिकाम्या मॅग्झिन आणि सहा जिवंत काडतुसे असा मुद्देमाल हस्तगत केला आहे .

सराईत गुन्हेगारांची संघटित गुन्हेगारी मोडण्यासाठी मोक्का : अटक करण्यात आलेले आरोपी सराईत गुन्हेगार असून, त्यांच्या विरोधात यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. या टोळीची संघटित गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी राजुरा पोलिसांनी विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र यांच्याकडे मोक्का कारवाईचा सविस्तर प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावाला मंजुरी देत विशेष पोलीस महानिरीक्षकांनी या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का), १९९९ मधील तरतुदी लागू करण्यास रीतसर परवानगी दिली आहे . राजुरा पोलिसांच्या हद्दीत पहिल्यांदाच मोक्का कायद्यांतर्गत झालेल्या या कारवाईमुळे संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी तथा सहायक पोलीस अधीक्षक कुमार सुशांत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत पोलीस निरीक्षक नितीन चिंचोळकर, पोलीस उपनिरीक्षक सुरेंद्र उपरे आणि पोलीस हवालदार कैलास आलाम यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## पारशिवनी पुलावरून कन्हान नदीत उडी घेऊन तरुणाने केला आत्महत्येचा प्रयत्न

### नशीब बलवत्तर म्हणून थोडक्यात वाचले प्राण



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१०, नागपूर :** पारशिवनी पुलावरून कन्हान नदीत उडी घेऊन एका तरुणाने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना १० सप्टेंबर गुरुवारला दुपारच्या सुमारास स्थानिक पोलीस स्टेशन हद्दीतील भानेगाव परिसरात उघडकीस आली, नशीब बलवत्तर म्हणून थोडक्यात प्राण वाचले त्यामूळे मोठा अनर्थ टळला.

आत्महत्या करण्याचा प्रयत्न करण्याऱ्या तरुणांचे नाव दीपक श्रावण ढोके (४०) वार्ड क्रमांक ३ भानेगाव असे असून खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात कंत्राटी कामगार म्हणून कार्यरत आहे.

गुरुवारला दुपारच्या दीपक ढोके हा तरुण पारशिवनी पुलावर दुचाकीने गेला. यावेळी दुचाकी उभी करून कन्हान नदीत उडी घेतली. मात्र, नशीब बलवत्तर म्हणून एक दगड त्याच्या हाती लागला कन्हान नदीत दीपक दगडावर बसून असल्याची माहिती वाऱ्यासारखी पसरली बघ्यांची एकच गर्दी जमली घटनेची माहिती खापरखेडा पोलीसांना देण्यात आली.

दोन व्यक्तींनी पाण्यात उडी घेऊन ट्यूब व दोरीच्या सहाय्याने दीपकला सुखरूप बाहेर काढले. मात्र, दिपकच्या पाठीला जबर मार लागल्याची माहिती आहे यासंदर्भात खापरखेडा पोलिसानी दीपकचे बयान नोंदविले असून अवैध सावकारांचे कर्ज मोठ्या प्रमाणात झाल्या मूळे दीपकने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती सूत्रांनी दिली असून पुढील तपास खापरखेडा पोलीस करीत आहे.

## ऊसगाळप १५ ऑक्टोबरपासून...

### मुख्यमंत्री फडणवीसांच्या अध्यक्षतेखालील मंत्री समितीच्या बैठकीत निर्णय

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, मुंबई :** ऊसगाळप हंगामाचे सन २०२६-२७ बाबतचे धोरण निश्चित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे मंत्री समितीची बैठक झाली. या बैठकीत यंदाचा ऊस गाळप हंगाम १५ ऑक्टोबरपासून सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.

या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि इतर अधिकारी उपस्थित होते. राज्यातील ऊस उपलब्धता, गाळपाचे नियोजन, साखर उत्पादन, शेतकऱ्यांना मिळणारा ऊसदर; तसेच साखर कारखान्यांसमोरील विविध आर्थिक व तांत्रिक बाबींचा बैठकीत सविस्तर आढावा घेऊन शेतकरी आणि साखर उद्योगाच्या हितामध्ये संतुलन साधून आगामी गाळप हंगामाचे नियोजन करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

**उपाययोजनांची चर्चा !**



यंदा एल निनो च्या प्रभावामुळे उसाच्या उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन त्या दृष्टीने विविध उपाययोजनांची चर्चा करण्यात आली; तसेच कारखान्यांना प्रलंबित देणी भागविण्यासाठी 'सॉप्ट लोन' योजनेवरील व्याज अनुदान सुरू करण्याबाबतही चर्चा झाली.

**साखरेबाबत आढावा...**

ज्या साखर कारखान्यांचे सहवीज निर्मिती प्रकल्पांशी संबंधित वीजखरेदी करार संपुष्टात आले आहेत, अशा कारखान्यांना २०२३-२४च्या हंगाम प्रमाणे प्रति युनिट १.५० रुपये अनुदान देण्याविषयीही चर्चा करण्यात आली.

**केंद्राकडे शिफारस करणार !**

साखर उद्योगासंदर्भातील केंद्र सरकारकडे प्रलंबित असलेल्या विषयांवरही बैठकीत चर्चा झाली. त्यात साखरेच्या किमान विक्री किमतीत वाढ करणे, इथेनॉलच्या दरात वाढ करणे; त्याचप्रमाणे इथेनॉल प्रकल्पांना प्रलंबित व्याज अनुदान तातडीने देणे, या मागण्यांसाठी केंद्र सरकारकडे शिफारस करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

**चारा छावण्या सुरू करण्याची वेळ**

सातारा : मान्सूनच्या पावसावर 'एल निनो'चे आलेले संकट आतापर्यंत खरे ठरले असून, सातारा जिल्ह्यातील पर्जन्यमानात ऑगस्टअखेर आठ टक्क्यांची तूट आहे. माण तालुक्यात ३१ टक्के पाऊस कमी झाला आहे. यामुळे पूर्व भागात दुष्काळी स्थिती निर्माण झाली असून, चारा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर होताना दिसून येत आहे. सप्टेंबरअखेर पाऊस मोठ्या प्रमाणात न झाल्यास चारा छावण्याही सुरू करण्याची वेळ सरकारवर येणार आहे.

**शेतकऱ्याचा आत्मदहनाचा प्रयत्न**

सोलापूर : पंढरपूर येथे ऊस दरासाठी शेतकरी आंदोलन सुरू असतानाच उसाला पोळ्याला आणि दिवाळीला हप्ता मिळावा, राहिलेले ऊस बिल मिळावे, या मागणीसाठी चंद्रकांत बागल या शेतकऱ्याने अंगावर डिझेल ओतून घेऊन आत्मदहनाचा प्रयत्न केला. ऊसदरासाठी उपोषण करून किडन्या खराब झाल्या; तरी कारखानदारांना जाग येत नसल्याने त्याने हे पाऊल उचलले.

## विठ्ठलच्या मृत्यूने पुंगळा हादरले; तीन तास महामार्ग रोखला!

**अक्षराज : राहीम कोक्कर**

**दि.१०, जिंतूर :** जिंतूर–औंढा राष्ट्रीय महामार्गावर पुंगळा येथील जिल्हा परिषद शाळेसमोर भरधाव क्रुझरच्या धडकेत अवघ्या आठ वर्षांच्या विठ्ठल अशोक जगताप या बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटनेने संपूर्ण पुंगळा गाव हादरले आहे. अपघातानंतर चालक वाहनासह फरार झाल्याने संतप्त ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेत सुमारे तीन तास रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती.ग्रामस्थांनी पोलीस प्रशासनास दिलेल्या निवेदनात फरार क्रुझर चालकाचा तातडीने शोध घेऊन त्याच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच नव्याने तयार करण्यात आलेल्या महामार्गावर आवश्यक रस्ता सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या नसल्याचा आरोप करत संबंधित रस्ता बांधकाम कंत्राटदार व निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**भरधाव क्रुझरची बालकाला धडक;**
**घटनास्थळावरच मृत्यू**

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, जिंतूरच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या क्रुझर वाहनाने विठ्ठल अशोक जगताप या बालकाला जोरदार धडक दिली. धडक एवढी भीषण होती की बालक काही अंतरावर फेकला गेला आणि गंभीर जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला. अपघातानंतर चालकाने घटनास्थळी न थांबता अंधाराचा फायदा घेत वाहनासह पलायन केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.या घटनेमुळे गावात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, 'हिट अँड रन' करणाऱ्या चालकाला तातडीने शोधून अटक करा, अशी मागणी जोर धरत आहे.

**शाळेसमोरील महामार्गावर सुरक्षा उपाययोजना कुठे?**

ग्रामस्थांनी उपस्थित केलेला आणखी गंभीर प्रश्न म्हणजे



शाळेसमोरून जाणाऱ्या महामार्गावर रस्ता सुरक्षेच्या आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत का?

ग्रामस्थांच्या आरोपानुसार, रस्त्यावर आवश्यक ठिकाणी स्पष्ट पांढरे पट्टे, झेब्रा क्रॉसिंग, वेगमर्यादा फलक, शाळा वस्ती क्षेत्राचे सूचना फलक, रेडियम रिफ्लेक्टर, ब्लिंकर, रंबल स्ट्रिप्स, कॅट आईज आदी सुरक्षाविषयक उपाययोजनांचा अभाव आहे. रात्रीच्या वेळी प्रकाशाची व्यवस्था नसल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला आहे.नव्याने तयार झालेल्या रस्त्यावर सुरक्षा व्यवस्था अपुरी का ठेवण्यात आली? रस्ता बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सुरक्षा निकषांची तपासणी कोणी केली? संबंधित विभागाने रस्ता वाहतुकीसाठी सुरक्षित असल्याचे प्रमाणित केले का? असे अनेक सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केले जात आहेत.

**तीन तास रास्ता रोको; प्रशासनाची धावपळ**

विठ्ठलच्या मृत्यूच्या निषेधार्थ आणि विविध मागण्यांसाठी ग्रामस्थांनी महामार्गावर रास्ता रोको आंदोलन सुरू केले. सुमारे तीन तास आंदोलन सुरू राहिल्याने प्रशासनाची मोठी धावपळ उडाली. ग्रामस्थांनी आपल्या मागण्यांवर ठाम भूमिका घेत संबंधित चालकाचा शोध, रस्ता सुरक्षेच्या उपाययोजना आणि जबाबदार व्यक्तींवर कारवाईची मागणी केली.प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी येऊन ग्रामस्थांशी चर्चा केली. यावेळी प्रशासनाकडून लेखी आश्वासन देण्यात आल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

**मागण्या पूर्ण न झाल्यास पुन्हा आंदोलनाचा इशारा...**

लेखी आश्वासनानंतर ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले असले तरी मागण्या पूर्ण न झाल्यास पुन्हा तीव्र रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा ग्रामस्थांनी प्रशासनाला दिला आहे.ग्रामस्थांनी सांगितले की, एका निष्पाप बालकाचा जीव गेला आहे. त्यामुळे केवळ आश्वासन देऊन प्रकरण थांबविण्याऐवजी फरार चालकाचा तातडीने शोध घेऊन त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी. तसेच महामार्गावरील रस्ता सुरक्षेच्या त्रुटींची चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी.

विठ्ठलचा मृत्यू व्यर्थ जाऊ देणार नाही; रस्ता सुरक्षित होईपर्यंत आमचा लढा सुरूच राहील, अशी संतप्त भावना ग्राम स्थांनी व्यक्त केली.दरम्यान, पोलिस प्रशासनाकडून फरार वाहन व चालकाचा शोध घेण्यासाठी तपास सुरू असून, परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे, टोलनाके, पेट्रोल पंप, हॉटेल्स तसेच इतर उपलब्ध फुटेज तपासण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

**बालकाचा मृत्यू की यंत्रणेचा निष्काळजीपणा?**

विठ्ठलच्या मृत्यूने आता केवळ एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला नसून, गावातून जाणाऱ्या महामार्गाच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे. शाळेसमोरून जाणाऱ्या रस्त्यावर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना नसतील, तर भविष्यात आणखी एखादा निष्पाप जीव जाण्याची वाट प्रशासन पाहत आहे का, असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून केला जात आहे.

प्रशासनाने दिलेले लेखी आश्वासन कितपत पूर्ण होते, याकडे पुंगळा ग्रामस्थांचे लक्ष लागले असून, मागण्या पूर्ण न झाल्यास पुन्हा रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा ग्राम स्थांनी दिला आहे.

## विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेतून मातीत साकारले नंदीबैल आणि बाप्पा

**अक्षराज : संतोष बांदूरकर**

**दि.१०, गोंडपिपरी :** बैलपोळा सणाचे औचित्य साधून जनता विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक माती शिल्प स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेला आणि सर्जनशीलतेला मुक्त वाव देत मातीतून आकर्षक नंदीबैल आणि गणपती बाप्पाच्या सुंदर मूर्ती साकारल्या. विद्यार्थ्यांनी मातीला योग्य आकार देत त्यावर आकर्षक सजावट व रंगसंगती करून आपले कलाकौशल्य पणाला लावले. पर्यावरणपूरकतेचा संदेश देणाऱ्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी साकारलेल्या विविध मातीच्या मूर्तींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. स्पर्धेचे परीक्षण प्रा. अतुल पिंपळकर, प्रा. ज्योती जीवतोडे आणि श्री. टिपले सर यांनी केले. प्राचार्य विकास कोकाटे यांच्या संकल्पनेतून तसेच संजय सोनुने यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धेतील प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला भेटवस्तू देऊन प्रोत्साहित करण्यात आले. तसेच प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना बक्षिसे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी लाडे मॅडम,



बेताल मॅडम, बोर्डे मॅडम, ठावरी सर, बोबडे सर आणि मोरे सर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष बांदूरकर यांनी केले. सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेटचे वाटप करून आनंदी वातावरणात कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.




## आचार्य विनोबा भावे

थोर गांधीवादी नेते भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची आज जयंती. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गोगादे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. आचार्य ही त्यांना मिळालेली पदवी आहे. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. तिथे त्यांचे आजोबा आणि आईने त्यांच्यावर धर्मपरायणतेचे संस्कार केले. वाई मुक्कामी विनोबा भावे यांनी स्वामी केवलानंद सरस्वतीच्या चरणांशी उपनिषदे, ब्राह्मसुत्रे, शंकरभाष्ये व पतांजलीचे शिक्षण घेतले. पुढे नोकरीनिमित्त त्यांचे वडील बडोदा येथे गेले. तिथेच त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण झाले. तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले. पण वाटेतच सुरतेस उतरुन आई वडिलांना न कळवता ते वाराणसी येथे निघाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते हिमालय आणि बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती या दोन्हींच्या प्रेरणा त्यांना महात्मा गांधींच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्वात आढळल्या. ७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्यांची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातुन मांडले. त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली. १९३०-३२ च्या कायदेभंग चळवळीत कारावास भोगलेले विनोबा भावे महात्माजींच्या १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे गांधींनी निवडलेले पहिले सत्याग्रही होते. १९५१ ते १९५३ हा भूदान यात्रेचा कालावधी वगळता सारे आयुष्य त्यांनी वर्ध्याच्या पवनार आश्रमात काढले. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. समाजाला मानव धर्माचे शिक्षण देणाऱ्या या सत्पुरुषाचे १५ नोव्हेंबर १९८२ रोजी निधन झाले. आचार्य विनोबा भावे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

## भारतीय कृषी विद्यालय व आदर्श प्राथमिक शाळेत दहीहंदी साजरी

अक्षराज : दिवाकर घेर

दि.०८, नागपूर : गोपाल एज्युकेशन संस्था अंतर्गत भारतीय कृषी विदयालय व आदर्श प्राथमिक शाळा नागपूर यांच्या संयुक्त विद्यमानाने शाळेमध्ये दहीहंदीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गोकुल कॉन्व्हेंट आणि प्रायमरी विभागाचे चिमुकले बालगोपाल व राधाची वेशभूषा साकारून सर्व विदयार्थी नटूनथटून आले होते. तसेच वर्ग ५ ते १० च्या सर्व विदयार्थ्यांनी दहीहंदी फोड स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला होता. प्रत्येक वर्गाची एक चमू याप्रमाणे भाग घेतला होता. सर्वीकडे 'हाथी घोडा पालखी, जय कन्हया लाल की' अशा घोषणा विदयार्थी देत होते. प्रथम गोपाल कृष्णच्या मूर्तीची पूजा करून दहीहंडीला सुरवात झाली. एकूण १२ चमूने भाग नोंदविला यामध्ये वर्ग १० वि चा चमू विजयी राहला.

भारतीय संस्कृतीचे महत्व आणि गोपाल काल्याचे महत्व शाळेच्या मुख्यध्यापिका अर्चना पन्नासे मॅडम यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. प्रायमरी मुख्याध्यपिका पेंदाम मॅडम व पर्यवेक्षक विनोद पवार यांच्या नेतृत्वात गिरी सर व अभिनिता कुंभारे मॅडम यांच्या पुढाकाराणे व ठाकरे मॅडम, बेलेकर सर, माटे मॅडम, बैलमारे मॅडम, डोईफोडे मॅडम, वडस्कर मॅडम, डायरे मॅडम व सर्व शिक्षक, शिक्षेकत्तर कर्मचारी यांच्या सहकार्याने कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

# वडिलधाऱ्या मंडळीचा सल्ला ऐकला म्हणून जीवनाचे सोने झाले

आजकाल कोणीही चांगल्या व्यक्तीचे आणि वडिलधाऱ्या मंडळीचे म्हणणे ऐकायला तयार नाही.अनेक संकटावर मात करून जीवनात यशाचे शिखर गाठलेली व्यक्ती त्यांचे अनुभव कथन करत असेल तर ते अनुभव ऐकणे इतरांसाठी नक्कीच फायद्याचे असते. एखादी चांगली व्यक्ती,चारित्र्यवान,नेक, निस्वार्थी,प्रामाणिक व्यक्ती आम्हाला चांगला सल्ला देत असेल तर आम्ही तो एकाग्रतेने ऐकला पाहिजे.निर्व्यसनी व्यक्ती व्यसन सोडायला सांगत असेल तर तात्काळ व्यसनाचा त्याग केला पाहिजे.उच्च पदावरील एखादी व्यक्ती जर एकाग्रतेने अभ्यास करण्याचा सल्ला देत असेल तर आपण अभ्यास केला पाहिजे.आईवडिलांनी सुट्टीच्या दिवशी शेतातील कामाला नेले तर आपण ते काम आवडीने करायला हवे. इतरांनी सांगितलेली प्रत्येक चांगली गोष्ट आपण एकाग्रतेने ऐकली पाहिजे.त्या चांगल्या गोष्टी,ते चांगले विचार आणि त्यांच्या चांगल्या सवयी आत्मसात केल्या पाहिजेत.तरच जीवन सार्थकी लागल्याचे समाधान मिळते.

आम्ही जेव्हा लहान होतो तेव्हा आजच्या एवढी मनोरंजनाची साधने उपलब्ध नव्हती.म्हणून रविवारी व इतर सुट्टीच्या दिवशी आम्ही सगळे सवंगडी वेगवेगळे मैदानी खेळ खेळायचो.खेळता खेळता आमची भांडणे व्हायची.तेव्हा आमची भांडणे सोडवायला माझी आजी यायची आणि ओरडून म्हणायची ,'सगळा रविवार सुट्टीत वाया घालवण्यापेक्षा थोडा अभ्यास केलास तर आफिसर होशील की.या वाईट पोरांची संगत सोडून दे अन् थोडं शिक्षणावर लक्ष दे'.आजीचे म्हणणे मी ऐकले.शाळा न शिकणाऱ्या व अभ्यास न करणाऱ्या मुलांसोबत राहणे व त्यांच्या सोबत खेळणे मी लगेच सोडून दिले.तेव्हापासून माझी अभ्यासातील प्रगती व शिक्षणातील एकाग्रता वाढली.

वर्गातील एक हुशार विद्यार्थी म्हणून ओळखला जाऊ लागलो.

घरची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती.तरीही माझ्या आईवडिलांनी आम्हा भावंडांना शिक्षण शिकवण्याचा निर्णय घेतला होता.कुटुंबाचा खर्च व आमच्या शिक्षणाचा खर्च पुरवताना आई वडिलांची दमछाक होत होती.हे लक्षात घेऊन सुट्टीच्या दिवशी किंवा इतर दिवशी शाळा बुडवून आईसोबत शेत मजुरीच्या कामासाठी आम्ही जात होतो.शाळा बुडवल्यावर त्या दिवशीचा आमचा अभ्यास बुडायचा.आमचे शैक्षणिक नुकसान व्हायचे.हे लक्षात घेऊन आमच्या शिक्षकांनी आम्हाला शाळा न बुडवण्याचा सल्ला दिला. आम्ही तो ऐकला आणि फक्त रविवारी आम्ही आईसोबत कामाला जात असू.

त्यामुळे आमच्या शिक्षणातील खंड बंद झाला.आईवडिलांनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट आम्ही ऐकली आहे.माझे वडील निर्व्यसनी होते आणि आम्ही पण निर्व्यसनी आहोत.शाळेत येता जाता जर आमच्या हातून काही चुकीचे कृत्ये घडले तर वडिलधारी मंडळी आम्हाला तंबी देत असत,आमचे कान पिळत असत. आम्ही त्यांचे म्हणणे गुपचूप ऐकून घेत होतो. आजकाल असे वातावरण गावात कुठेच दिसत नाही.

सहावी वर्गात असताना स्वातंत्र्यसैनिक कालिदासराव देशपांडे व गणेशराव गुळवे गुरुजी यांनी अवांतर वाचन करण्याचा सल्ला दिला होता.तो सल्ला माझ्यासाठी लाखमोलाचा ठरला. तेव्हापासून अवांतर वाचनाची गोडी कायम आहे आणि आता बऱ्यापैकी लेखनकला अवगत झाली आहे. समाजात आणि मित्र परिवारात लेखक व कवी म्हणून माझी नवीन ओळख निर्माण झाली आहे.

एम.एस्सी.ही पदविका प्रथमश्रेणीत उत्तीर्ण झाल्यानंतर बीजे व एमजे हे दोन अभ्यासक्रम पूर्ण करून पत्रकारिता क्षेत्रात जाण्याचा मी निर्णय घेतला होता.

परंतु माझे बंधू प्रा.राजेंद्र गुळवे यांनी मला बी.एड्.करण्याचा सल्ला दिला होता.भावनेला लगाम घालून मी माझा निर्णय बदलला आणि बी.एड्.करण्याचा निर्णय घेतला.माझ्या सुदैवाने पुणे येथील सदाशिव पेठेतील टिळक शिक्षण कॉलेजमध्ये माझा बी.एड्.चा प्रवेश निश्चित झाला.बी.एड्.पूर्ण झाल्यावर केवळ गुणवत्तेच्या जोरावर मला सरकारी शाळेत गणित विषयाच्या माध्यमिक शिक्षकाची नोकरी मिळाली. गणित विषयाचा उत्कृष्ट शिक्षक, कर्तव्यदक्ष गुणवंत शिक्षक म्हणून शासनाचे व अनेक सामाजिक संघटनांचे आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाले.आणि आज रोजी मुख्याध्यापक पदावर कार्य करण्याची संधी मिळाली आहे. आज रोजी माझ्या शिक्षकी पेशाला २३ वर्षे पूर्ण झाली आहेत.माझे अनेक विद्यार्थी क्लासवन अधिकारी,डॉक्टर,इंजिनिअर, न्यायाधिश,वकील,प्राध्यापक व इतर विविध पदांवर सन्मानाने नोकरी करत आहेत.आज रोजी माझा विद्यार्थी परिवार व मित्र परिवार फार मोठा आहे.

माझा मोठा मुलगा दिनेश याचा वैद्यकीय शिक्षणासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश निश्चित झाला आहे.

आईवडिलांनी आम्हाला शिकवले व आम्ही त्यांचा विश्वास सार्थ ठरवला. नातेवाईकांनी,शिक्षकांनी व इतर हितचिंतकांनी ज्या ज्या वेळी योग्य सल्ला दिला तो मी ऐकला. म्हणून आज जीवनाचे सोने झाल्याचे समाधान मिळत आहे.खंत एकाच गोष्टीची वाटते की सध्याच्या काळातील काही विद्यार्थी, नात्यातील काही तरूण मुले मुली त्यांच्या आईवडिलांचे,नातेवाईकांचे व शिक्षकांचे म्हणणे व त्यांचा सल्ला अजिबात ऐकत नाहीत,मनावर घेत नाहीत.म्हणून ते जीवनात स्थीर नाहीत व चांगल्या प्रकारे शिक्षण शिकत नाहीत .त्यांनी त्यांच्या नातेवाईकांचा,शिक्षकांचा

व वडिलधाऱ्या मंडळीचा सल्ला ऐकून चांगल्या गोष्टी आत्मसात कराव्यात. जीवन सुधारण्याची संधी पुन्हा पुन्हा मिळत नाही हे लक्षात घ्यावे.

**– बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९७३०९३९७३२.**

# 'मारबत उत्सव' – आपली विडंबना दडपण्याचा सत्ताधारी पक्षाचा प्रयत्न

प्रत्येक सणाची काही ना काही आख्यायिका असते आणि त्यातून विशिष्ट समुदायाला अथवा विशिष्ट शहराला एक अद्भूत ओळख मिळालेली असते. अशीच काहीशी ओळख मारबत उत्सवापासून नागपूरला मिळालेली आहे. नागपूरचा मारबत उत्सव हा महाराष्ट्रातील विदर्भ भागात पोळ्याच्या दुस-या दिवशी म्हणजेच तान्हा पोळ्याच्या दिवशी साजरा केला जाणारा एक अद्वितीय आणि ऐतिहासिक उत्सव आहे. ही सुमारे १४० ते १४४ वर्षे जुनी परंपरा आहे, जी प्रामुख्याने नागपूरातच साजरी केली जाते. याची सुरुवात १८८१-१८८५ च्या सुमारास त-हाणे तेली समाजाने केली. या उत्सवात पिवळी व काळी मारबत यांचे मोठे पुतळे तयार करून त्यांची मिरवणूक काढली जाते. कृष्णाला मारण्यासाठी आलेल्या पुतना मावशीचे प्रतीक म्हणून 'काळी मारबत' तर लोकांचे रक्षण करणा-या शक्तीचे प्रतीक म्हणून 'पिवळी मारबत' मानली जाते. समाजातील वाईट चालीरीती, अंधश्रद्धा, रोगराई, महागाई




आणि अनिष्ट प्रवृत्ती दूर जाव्यात यासाठी इडा-पीडा घेऊन जा गे मारबत असा नारा देत हा उत्सव साजरा होतो. एकूणच इडा-पीडाचे निरोपण होते. मारबतीच्या बरोबरीने चालू घडामोडी, राजकीय विडंबन आणि सामाजिक समस्यांवर भाष्य करणारे 'बडग्या' नावाचे पुतळेही मिरवणुकीत रांगेत फिरवले जातात आणि शेवटी त्यांचे दहन केले जाते.

रसाळ संत्री, झिरो माईल, दीक्षाभूमी आणि वाघ अशी शहराची ओळख सांगणारी अनेक वैशिष्ट्ये डोळ्यासमोर येतात. मात्र नागपूरच्या सांस्कृतिक ओळखीचा अनोखा भाग म्हणजे मारबत-बडग्यांची मिरवणूक. धार्मिक आणि सांस्कृतिक मिरवणुका देशभरात पाहायला मिळतात. मात्र वाईट प्रवृत्ती, सामाजिक अनिष्ट रूढी-परंपरा तसेच ब्रिटिश सत्तेविरोधातील भावना प्रतीकात्मक पद्धतीनं व्यक्त करणारा मारबत उत्सव नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासात विशेष स्थान राखतो. राज्यविकास पर्यटन मंडळाने मान्यता दिलेल्या नागपूर शहराने वर्षानुवर्षे मारबत मिरवण्याची परंपरा जपली आहे आणि त्यामुळे संपूर्ण देशातील मारबत मिरवणुकीच्या वेगळेपणासाठी नागपूर हे शहर ओळखले जाते. मारबत उत्सव म्हणजे नागपूर शहराला लाभलेला ऐतिहासिक वारसा. नागपूरमध्ये दरवर्षी बैल पोळ्याच्या दुस-या दिवशी पिवळी व काळी मारबत तसेच बडग्याची भव्य मिरवणूक धूमधडाक्यात काढली जाते. काळ्या मारबतीची सुरुवात १८८० मध्ये, तर पिवळ्या मारबतीची सुरुवात १८८४ मध्ये झाली होती. देशविदेशात चर्चा व वेगळी ओळख मिळालेल्या या उत्सवाला जवळपास १४० वर्षांची परंपरा लाभली आहे. संपूर्ण देशात हा उत्सव फक्त नागपूरातच साजरा केला जातो. कोरोना अपवाद वगळता यात कधीच खंड पडला नाही. १८९७ मधील अगदी प्लेगची साथ आणि १९२७ मध्ये दंगे सुरु असतानाही हा उत्सव कुठल्याही अडथळ्याविना पार पाडल्या गेला. या अभिनव प्रथेच्या माध्यमातून वर्षभर देशात घडलेल्या चांगल्या-वाईट घटनांवर भाष्य करणारे बडगे (मोठे पुतळे) तयार केले जातात. या वैशिष्ट्यांमुळे शहरातीलच नव्हे तर आजूबाजूच्या राज्यांमधून लाखो नागरिक मारबत मिरवणूक बघण्यासाठी आवर्जून येत असतात आणि या उत्सवाचा आनंद घेतात. पिवळ्या मारबतीसोबतच काळ्या मारबतीलाही ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. श्री देवस्थान पंच कमिटीतर्फे गेल्या १३५ वर्षांपासून इतवारीस्थित नेहरू पुतळ्यापासून काळ्या मारबतीची मिरवणूक काढली जाते. सगळ्यात पूर्वी अप्पाजी मराठे काळ्या मारबतीचा उत्सव साजरा करत असत. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतावर इंग्राजांचं राज्य होतं. त्यांच्याकडून होत असलेल्या जुलमी कारनाम्यांनी जनता त्रस्त होती. त्यावेळी नागपूरच्या राजघराण्यातील भोसले राजा यांची बहीण बाकाबाईने इंग्रजांशी हातमिळणी केली होती. त्याचा निषेध करण्यासाठी १८८१ पासून काळी मारबत मिरवणूक काढण्यात येत आहे. बाकाबाईच्या नव-यानेपण या तिच्या कृत्याचा विरोध केला नाही. म्हणून त्याचाही पुतळा बनवून सोबतच त्याचीपण मिरवणूक काढतात. इंग्रजांचे राज्य जाऊन आज कितीतरी वर्षे लोटली. परंतु, नागपूरकर आणि या परीसरातील नागरिकांच्या मनात बाकाबाईच्या कुकृत्यामुळे झालेली जखम अजून भळभळतेच आहे. नेहरू पुतळ्याजवळील हनुमान मंदिरात ही काळी मारबत आहे. ब्रिटीश राजवटीत लोक अत्याचाराने त्रस्त होते. परकीय गुलामगिरीचे पाश तुटून देश स्वतंत्र व्हावा, या भावनेने १८८५ मध्ये जागनाथ बुधवारी परिसरात त-हाणे तेली समाजबांधवांनी पिवळी मारबत उत्सव कमिटीची स्थापना केली. ती परंपरा आजही सुरु आहे. या परंपरेला नागपूर शहरात विशेष महत्त्व आहे. पोळ्याच्या दुस-या दिवशी अर्थात तान्हा पोळ्याच्या दिवशी नागपूरात काळी आणि पिवळी मारबत तसेच सामाजिक व राजकीय मुद्द्यांवर भाष्य करणा-या बडग्याची मिरवणूक काढली जाते. देशात फक्त नागपूरातच ही परंपरा असून दरवर्षी नागपूरकर उत्साहात या मिरवणुकीत भाग घेऊन आनंदोत्सव साजरा करतात. काळी व पिवळी मारबत उत्सव समिती व बडग्या उत्सव समितीकडूनच मिरवणुकीसह विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. मात्र यावर्षी प्रथमत: महापालिकेतील सत्ताधारी भाजपने तो साजरा करण्याचे ठरवले आहे. त्यामुळे मारबत उत्सव आयोजक समितीकडून 'हायजॅक' करण्याचा प्रयत्न केला जात आहे. 'ईडा पिडा घेऊन जा गे मारबत' असा जयघोष करीत तरुण या मारबत मिरवणुकीत सामील होतात. स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मुद्द्यांकडे लक्ष वेधणारे बडगेही या मिरवणुकीत सामील केले जातात. अर्थात अनेक बडगे हे राज्य किंवा केंद्र सरकारच्या धोरणाविरुद्ध असतात. अशावेळी सरकारच्या नावानेही या मिरवणुकीत बोंब ठोकली जाते. सरकारविरोधात एका दिवसासाठी दिलेल्या घोषणांमुळे सत्ताधा-यांविरोधात वातावरण तयार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महापालिकेतील भाजप सत्ताधा-यांनी या महोत्सवासाठी प्रथमच अर्थसंकल्पात तरतूद केल्याने आताच या महोत्सवाला महापालिकेने हातात का घेतले? अशी चर्चा रंगली आहे. मारबत मिरवणुकीत ८० टक्के तरुणांचा समावेश असतो. नुकताच जंतर-मंतरवरील आंदोलनातून तरुण दूर जात असल्याचे भाजपच्या लक्षात आल्याचे केंद्र सरकारने घेतलेल्या एक विद्यापीठ एक मंत्री संवादाच्या निर्णयातून दिसून येत आहे. त्यामुळे तरुणापर्यंत पोहोचण्यासाठी मारबत महोत्सव उत्तम संधी असल्याने भाजप सत्तेत असलेल्या महापालिकेने हा उत्सव हातात घेतल्याचीही चर्चा यानिमित्त रंगली आहे. सत्ताधा-यांच्या या प्रयत्नातून तरुण भाजपच्या गळाला लागणार काय, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल. आतापर्यंत काळी व पिवळी मारबत उत्सव समिती व बडग्या उत्सव समितीचे पदाधिकारी व्यापारी वर्गाकडून वर्गणी गोळा करून देखणी व आकर्षक मिरवणूक काढत होती. एका लाखापेक्षा जास्त नागरिक यात सहभागी होत असल्याने महापालिकेची भूमिका मिरवणूक गेल्यानंतर रस्ते स्वच्छ करण्याची होती. परंतु यंदा महापौर नीता ठाकरे यांच्या नेतृत्वात सध्या महापालिकेकडून मारबत महोत्सवाची जोरदार तयारी सुरु आहे. महापालिकेच्या स्थायी समिती सभापती शिवानी दाणी यांनी अर्थसंकल्पात या महोत्सवासाठी २ कोटींची तरतूद केली आहे. हा नागरिकांचा उत्सव असल्याने यात नागरिकांच्या सहभागासाठी महापालिकेला प्रयत्न करावे लागणार नाही. परंतु महापालिकेने या महोत्सवासाठी केंद्रातील मंत्री, देशातील व्यक्तिविशेषच नव्हे तर परदेशातील भारतीयांनाही बोलावण्याचा निर्धार केला असून निमंत्रण दिले जात आहे. आता या महोत्सवाच्या निमंत्रणाला केंद्रीय स्तरावरील नेते, परदेशी पाहुणे किती प्रतिसाद देतात, यावर महापालिकेचे यश अवलंबून राहणार असल्याचे उत्सव समितीतील काहींनी नमूद केले. त्यामुळे महापालिकेला या डावपेचात यश मिळेल का याकडे डोळस नजरेने पाहिल्या जाईल.

१४५ वर्षांची परंपरा असलेल्या मारबत महोत्सवाला प्रथमच महापालिकेने आपल्या हातात घेतले. परंतु यापूर्वी असा प्रयत्न महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने (एमटीडीसी) ने २०१३-१४ मध्ये महोत्सवाला प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली होती. नागपूरची ही अनोखी संस्कृती देशातील व जगातील पर्यटकांपर्यंत पोहोचावी यासाठी महामंडळाने मारबत महोत्सवाला पर्यटनाच्या नकाशावर स्थान दिले होते. एमटीडीसीने त्यावेळी शहरात केवळ काही बॅनर लावले. मारबत निघते त्या भागात एक मंडप टाकला. एवढाच तोंडदिखाऊपणा एमटीडीसीने त्यावेळी केला. त्यामुळे अनेकांनी नाराजी व्यक्त केली. मुळात मारबत महोत्सव समितीला महामंडळाचा काहीही फायदा झाला नाही. त्यानंतर एमटीडीसीने मारबत महोत्सवाचे कधीही नाव काढले नाही. समाजातील अनिष्ट प्रथा नष्ट करण्याच्या उद्देशाने बैल पोळ्याच्या दुस-या दिवशी मारबत मिरवणूक काढण्यात येते. कृष्णाला मारण्यासाठी आलेली पुतना मावशीचे प्रतीक म्हणून काळी मारबत, तर पिवळी मारबत लोकांचे रक्षण करते, अशी आख्यायिका आहे. १८८५ मध्ये तराणे तेली समाजाच्या लोकांनी जागनाथ बुधवारी परिसरात पिवळी मारबत उत्सव समितीची स्थापना करून इंग्रजांच्या दडपशाही आणि अत्याचाराविरुद्ध पिवळी चळवळ सुरु केली. आता मात्र समाजातील सर्व संकटे, रोगराई आणि वाईट प्रवृत्ती दूर पळाव्यात व चांगल्या विचारांचे स्वागत व्हावे यासाठी मारबतीची मिरवणूक काढली जाते. बडग्या हा दरवर्षीच्या चालू घडामोडी, महागाई, भ्रष्टाचार किंवा सामाजिक वाईट प्रवृत्तींचे प्रतीक म्हणून तयार केला जातो. त्याला समाजसुधारणेचे व राजकीय विडंबनाच्या फलकाची जोड असते.

परंपरेनुसार माझे मारबताकडे एवढेच साकडे आहे की, जे नालायक आणि केवळ आपलाच स्वार्थ पाहणारे मंत्री, खासदार, आमदार, अधिकारी, कर्मचारी आणि गाव पातळीवरील लायकी नसलेले, आपलाच फायदा साध्य करणारे आणि लिडरगिरी दाखविणा-या लिडर्सना मारबत घेऊन जावे. बाय चॉन्स त्यांच्या आधी मीच गेलो, तर त्यांच्या उरावर बसल्याशिवाय राहणार नाही एवढे मात्र निश्चित..!

**सुनील शिरपुरे, कमळवेल्ली, यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७४९८८८५०६१**

## महत्व

मैत्रीणीकॉन्हेटमधल्या
गावा आल्या सगळ्या
शिवारा सुखे हुंदडल्या
झाल्या मना मोकळ्या

शहरामधले बेगडीपण
गं क्षणार्धात विसरल्या
माखू द्या कपडेधुळीने
गवतातछान पसरल्या

श्वास घ्याया शिकल्या
शुद्ध हवेत शहारल्या
अनवाणी पाय मातीत
फुलकाट्या विहारल्या

जितराब न कुटुंब असे
जाणे ढवळ्यापोवळ्या
ऋण अमूल्य निसर्गाचे
भावले मना कोवळ्या

दूर ठेवी नखरे डायटचे
मनसोक्त पुरणपोळ्या
बैलांना आनंदे भरवता
आणे रंगत बैल पोळ्या

आधुनिक नव शेतकरी
तरीभावना ना वेगळ्या
बैल बंधु साठी भोळ्या
घासअडकला गं गळ्या

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# गोवंडीत ४८४ एसआरए लाभार्थ्यांच्या पुनर्वसनासाठी आमरण उपोषण

## १४ वर्षांपासून पुनर्वसन रखडले; विकासक आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईसह १३ मागण्यांसाठी आंदोलन

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.१०, गोवंडी (मुं.उपनगर) :** गेल्या तब्बल १४ वर्षांपासून पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत असलेल्या गोवंडीतील ४८४ एसआरए पात्र लाभार्थ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पंचशील (गोवंडी) एसआरए को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि. आणि एकता (गोवंडी) एसआरए को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि. या दोन सोसायट्यांतील पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळावा, रखडलेले पुनर्वसन तातडीने पूर्ण करावे आणि संदेश बुद्ध विहाराचे प्रलंबित बांधकाम व सौंदर्यीकरण पूर्ण करावे, यासह विविध मागण्यांसाठी ७ सप्टेंबर २०२६ रोजी गोवंडी येथे आमरण उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली आहे.

एम/पूर्व विभागातील प्रभाग क्रमांक १४०, सर्वे क्रमांक ९३ व ९७ तसेच सी.टी.एस. क्रमांक ७ (भाग), वामन तुकाराम पाटील मार्ग, गौतम नगर, गोवंडी येथील या एसआरए प्रकल्पात पंचशील सोसायटीचे ८८ आणि एकता सोसायटीचे ३९६ असे एकूण ४८४ पात्र लाभार्थी आहेत. मात्र, सन २०१० ते २०१२ या कालावधीत मूळ घरांमधून बाहेर पडलेल्या या कुटुंबांना अद्याप त्यांच्या हक्काच्या पुनर्वसन सदनिकांचा ताबा मिळालेला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर सेंट्रिओ एम. जे. शाह छ.द. गेट अ२ समोरील लहुजी सालवे मैदान सार्वजनिक फुटपाथ, गौतम नगर, गोवंडी येथे आमरण उपोषणाचे आयोजन करण्यात आले आहे. १४ वर्षांचा विलंब संपवून पुनर्वसनाला निश्चित दिशा देण्यासाठी शासन, एसआरए प्रशासन आणि संबंधित विकासकांनी लेखी स्वरूपात ठोस निर्णय द्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. प्रत्येक पात्र लाभार्थ्याला त्याच्या पुनर्वसनाच्या घराचा इमारत क्रमांक, सदनिका क्रमांक, ठिकाण आणि निश्चित ताबा देण्याची तारीख याबाबत विकासक आणि शासनाकडून लेखी शपथपत्र देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. केवळ आश्वासने न देता पुनर्वसनाचे स्पष्ट वेळापत्रक जाहीर करून त्याची अंमलबजावणी करावी, अशी भूमिका घेण्यात आली आहे.दरम्यान, पुनर्वसन इमारत क्रमांक ३चे बांधकाम सुरू असून ही इमारत ऑगस्ट २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ४८४ लाभार्थ्यांना २०१०-२०१२ मध्ये घरांमधून बाहेर करण्यात आले असल्याने "First Out, First In' या तत्त्वानुसार त्यांना पुनर्वसनात प्रथम प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. इमारत क्रमांक ३ पूर्ण झाल्यानंतर ती संबंधित ४८४ पात्र लाभार्थ्यांच्या पुनर्वसनासाठी राखीव ठेवावी आणि त्यातील सदनिकांचा व्यावसायिक विक्रीसाठी किंवा अन्य कारणांसाठी वापर करू नये, अशीही मागणी आहे.

पुनर्वसनास झालेल्या १४ वर्षांच्या विलंबामुळे लाभार्थी कुटुंबांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागल्याचा दावा करण्यात आला असून, या विलंबासाठी योग्य व न्याय्य मुआवजा देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच प्रकल्पातील कथित अनियमितता, मनमानी कारभार आणि २०११ मधील MMRDA च्या अटींच्या कथित उल्लंघनाची सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.या प्रकरणातील सुमारे २५७ लाभार्थी अनुसूचित जाती/जनजाती प्रवर्गातील असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. संबंधित विकासक, संचालक, भागीदार व जबाबदार पदाधिकाऱ्यांविरोधात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ मधील लागू तरतुदींनुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर कर्तव्यात जाणीवपूर्वक कसूर करणाऱ्या संबंधित एसआरए अधिकाऱ्यांविरोधातही कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात




आली आहे. प्रकल्पाशी संबंधित लकडावाला डेव्हलपर्स प्रा. लि., सेंट्रिओ लाइफ स्पेसेस लिमिटेड, नॉर्थ प्रॉपर्टी डेव्हलपर्स एलएलपी आणि सत्रा रियल्टी अँड बिल्डर्स लिमिटेड यांच्या संबंधित प्रकल्पातील एस्क्रो खाते व इतर बँक खाती चौकशीदरम्यान गोठवावीत, अशीमागणी ही करण्यात आली आहे. पुनर्वसनासाठी राखीव निधी अन्यत्र वळवला जाऊ नये, यासाठी ही कारवाई आवश्यक असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

पुनर्वसन पूर्ण होईपर्यंत संबंधित विकासकांना नवीन Commencement Certificate (CC) आणि Occupancy Certificate (OC) देण्यावर स्थगिती आणावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच प्रकल्पातील FSI चा वापर, खरेदी-विक्री व्यवहार, आर्थिक व्यवहार आणि बांधकामाशी संबंधित सर्व बाबींचे स्वतंत्र आर्थिक व बांधकाम ऑडिट करण्यात यावे. यासाठी ED, EOW, AGRC आणि सक्षम यंत्रणांमार्फत चौकशी करावी, अशी मागणी आहे. या प्रकरणात संक्रमण शिबिरातील रहिवाशांच्या सुरक्षेचा मुद्दाही आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला आहे. गोवंडी परिसरातील चक्कृअ इमारतीतील दुर्घटनेनंतर संक्रमण शिबिरात राहणाऱ्या लाभार्थी कुटुंबांच्या सुरक्षिततेबाबत चिंता निर्माण झाली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे स्थायी पुनर्वसनाचा प्रत्यक्ष ताबा मिळेपर्यंत लकडावाला सेंट्रिओ आणि नॉर्थ स्टार प्रकल्पातील उपलब्ध सुरक्षित सदनिकांमध्ये तात्पुरती निवास व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या एसआरए प्रकल्पातील संदेश बुद्ध विहाराचे बांधकाम २०१२ पासून रखडलेले असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सेंट्रिओ अ, इ, उ आणि ९ North टॉवर्सची विक्री झाल्यानंतरही बुद्ध विहाराचे बांधकाम व सौंदर्यीकरण अपूर्ण असल्याचे निवेदनात म्हटले आहे. बौद्ध समाजाच्या धार्मिक व सामाजिक गरजा लक्षात घेऊन बुद्ध विहाराचे बांधकाम निश्चित कालमर्यादेत पूर्ण करून ताबा देण्याची तारीख शासन आणि विकासकांनी लेखी स्वरूपात जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय MahaRERA नोंदणीकृत चॅनेल पार्टनर्सची वैध थकीत देणी तातडीने अदा करावीत आणि त्यांना झालेल्या आर्थिक, मानसिक व व्यावसायिक नुकसानीबाबत संबंधित विकासकांनी लेखी माफी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.४८४ कुटुंबांचा १४ वर्षांचा पुनर्वसनाचा प्रश्न, संक्रमण शिबिरातील सुरक्षेचा गंभीर मुद्दा, बुद्ध विहाराचे रखडलेले बांधकाम, प्रकल्पातील आर्थिक व्यवहारांचे ऑडिट आणि विकासक व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई, अशा विविध मागण्यांमुळे गोवंडीतील हे आंदोलन महत्त्वाचे ठरणार आहे. या १३ प्रमुख मागण्यांवर शासन आणि एसआरए प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन ४८४ पात्र लाभार्थ्यांना न्याय द्यावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

# श्री शिवाजी विद्यालय बुलढाणा येथे बैलपोळा उत्सव व पर्यावरण पूरक गणेशोत्सव मूर्ती प्रदर्शन संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, बुलढाणा :** श्री शिवाजी विद्यालय तथा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, बुलढाणा येथे गुरुवार, दिनांक १० सप्टेंबर २०२६ रोजी बैल पोळा उत्सव व पर्यावरण पूरक गणपती मूर्ती प्रदर्शनाचे आयोजन उत्साह पूर्ण वातावरणात करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रमोद कावरे, पर्यवेक्षक पी.नरवास, शिक्षक प्रतिनिधी योगेश भोंडे, नितीन ढोमणे उपस्थित होते.

भारतीय संस्कृती शेतकरी जीवन, आणि पर्यावरण संवर्धन याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे तसेच विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा म्हणून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. वर्ग पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी माती पासून बनवलेल्या बैलांचे आकर्षक सजावटीचे नमुने तयार केले. तसेच विद्यार्थ्यांनी शाडूची माती कागद नैसर्गिक रंग तसेच उपलब्ध पर्यावरण पूरक साहित्याचा वापर करून विविध आकर्षक गणपतीच्या मूर्ती तयार केल्या. 'प्लास्टिक व रासायनिक रंगाना नकार, पर्यावरण पूरक गणेशोत्सवाचा स्वीकार' असा संदेश या प्रदर्शनातून देण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या मूर्तीचे कौतुक केले. इयत्ता पाचवी ते बारावीच्या गटातून





आकर्षक मूर्ती बनवणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रथम, द्वितीय, तृतीय निवड करण्यात आली. प्राचार्य प्रमोद कावरे यांनी पोळा या सणाचे महत्व तसेच पर्यावरण पूरक गणपती मूर्तीचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. या कार्यक्रमाचे आयोजन स्काऊड गाईड ग्रुप व चित्रकला शिक्षक श्री काळवाघे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षिका हिंगे मॅडम यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री सावळे यांनी केले. कार्यक्रमाचे उत्तम छायाचित्रण श्री वाघ, श्री परिहार यांनी केले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# बनावट ओळख व सही करून शालेय रेकॉर्ड घेतल्याचा आरोप

## जिंतूरच्या जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील प्रकरण; शहजान सिद्दिकीविरुद्ध BNS अंतर्गत गुन्हा दाखल

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१०, जिंतूर (परभणी) :** शहरातील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दुसऱ्या व्यक्तीची ओळख धारण करून बनावट अर्ज व सहीच्या माध्यमातून शाळेतील रेकॉर्डचा उतारा घेतल्याचा आरोप समोर आला आहे. या प्रकरणी जिंतूर पोलिस ठाण्यात शहजान निजामुद्दीन सिद्दिकी (रा.बलसा रोड, जिंतूर) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१९(२), ३३६(३), ३४०(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० ते दुपारी १.३० वाजेच्या दरम्यान जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात हा प्रकार घडल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले




आहे.

**दुसऱ्याच व्यक्तीच्या नावाने अर्ज केल्याचा आरोप**

या प्रकरणातील फिर्यादी संजीव नारायण केदार यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, संबंधित आरोपीने शाळेत जाऊन स्वतःची ओळख लपवून आपणच मोहम्मद अथर शेख नूर असल्याचे भासविल्याचा आरोप आहे. तसेच मोहम्मद अथर शेख नूर यांच्या नावाने लेखी अर्ज देऊन त्यांची बनावट सही केल्याचेही तक्रारीत नमूद आहे.यानंतर संबंधित व्यक्तीच्या नावाने शाळेतील रेकॉर्डचा निर्गम उतारा मागवून तो हस्तगत केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**९ महिन्यांनंतर पोलिसांत तक्रार**

घटना जानेवारी महिन्यातील असली तरी या प्रकरणाची तक्रार ९ सप्टेंबर २०२६ रोजी जिंतूर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली. फिर्यादीने त्याच दिवशी पोलिस ठाण्यात येऊन तक्रार दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलिस नोंदीत नमूद आहे. पोलीस निरीक्षक रेड्डी यांच्या आदेशाने गुन्हा दाखल करण्यात आला असून, प्रकरणाचा पुढील तपास म. सपोनि लोकडे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

**कलम ३१९(२), ३३६(३), ३४०(२) BNS अंतर्गत कारवाई**

या प्रकरणात भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शाळेतील अधिकृत कागदपत्रे, अर्ज, सही आणि संबंधित रेकॉर्ड याबाबत पोलिसांकडून पुढील तपास केला जाणार आहे.या प्रकरणातील आरोपांची सत्यता तपासाच्या निष्कर्षावर अवलंबून असून, गुन्हा दाखल होणे म्हणजे आरोप सिद्ध होणे नव्हे, हेही महत्त्वाचे आहे.गुन्हा दाखल करण्याची कारवाई ९ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४.३५ वाजता करण्यात आली. गुन्हा दाखल करणारे अधिकारी सपोनि महीपाळे असून, पुढील तपास म. सपोनि लोकडे करीत आहेत.

# थोडक्यात बातम्या

## टाकळी ढोकेश्वर परिसरात श्रावणी बैलपोळा उत्साहात



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** शेतकऱ्यांचा सवंगडी असलेल्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा बैलपोळा सण टाकळी ढोकेश्वर परिसरात उत्साहात साजरा झाला. शेतकऱ्यांनी आपल्या सर्जा - राजाची मनोभावे पूजा करत, ढोलताशांच्या गजरात, भंडाऱ्याची मुक्त उधळण करीत, सजविलेल्या बैलांची सामूहिक मिरवणुका काढल्या होत्या.

कान्हुरपठार, वासुंदे, वडगाव सावताळ कर्जुले हार्या भागात साजऱ्या झालेल्या श्रावणी बैलपोळ्यासाठी खेड्यापाड्यात विशेष उत्साह, जल्लोष आणि आनंदाचे वातावरण होते. शेतीतील वाढत्या यांत्रिकीकरणामुळे बैलांची संख्या कमी झाली असली, तरी आजही अनेक शेतकरी कुटुंबात बैलांची मनोभावे जोपासना केली जाते. टाकळी ढोकेश्वर परिसरात विशेषतः कान्हुरपठार येथे बैलपोळ्याचा उत्साह जाणवला.

सकाळीच बैलांना अंघोळ घालून आणल्यानंतर गळ्यात घागरमाळा, पायात तोडे, शिंगे रंगवून त्यात गोंडे किंवा फुगे, मोरपीस अडकवून आणि अंगावर रेशमी झूल पांघरून बैलांची मनोभावे पूजा केली. पुरणपोळीचा नैवेद्य खाऊ घातल्यानंतर आपापल्या परिसरातील दैवतांच्या मंदिरांपर्यंत मिरवणुका काढण्यात आल्या. परिसरात मशागतीच्या बैलांची संख्या नगण्य असली तरी बैलगाडा मालक व बैलगाडा शौकीनांची संख्या मोठी आहे. विविध संघटनांच्या या बैलगाडा मालक व बैलगाडा शौकीनांनी एकत्र येत भंडाऱ्याची उधळण, वाद्यांच्या तालावर मिरवणूक काढीत श्रावण महिन्यातील बैलपोळा साजरा झाला.

ग्रामदेवताच्या दर्शनानंतर सुवासिनींच्या हस्ते औक्षण करून बैलांना पुरणपोळीचा घास भरविण्यात आला. यंदाच्या वर्षी दुष्काळ असल्याने शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. पाऊस पाणी समाधानकारक असता तर शेतकऱ्यांनी बैलपोळा सण आणखी उत्साहात साजरा केला असता,असे प्रगतशील शेतकरी अशोक पाटील यांनी सांगितले.

## बिबट्याच्या हल्ल्यात २ वर्षांच्या चिमुकल्याचा करुण अंत; अर्थे बुद्रुक परिसरात घबराट



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.१०, शिरपूर (धुळे) :** शिरपूर तालुक्यातील बोराडी वनक्षेत्रांतर्गत येणाऱ्या वासर्डी परिमंडळातील अर्थे बुद्रुक शिवारात बिबट्याच्या भयंकर हल्ल्यात दोन वर्षांच्या निष्पाप बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. योगेश पर्मिया सांगळ असे मृत बालकाचे नाव आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र भीतीचे व शोकाकुळाचे वातावरण पसरले आहे.नेमकी काय घडली घटना? दिनांक ०९ सप्टेंबर रोजी रात्री ७:३० वाजेच्या सुमारास अर्थे बुद्रुक शिवारातील शेख रऊफ शेख सुलेमान खाटीक यांच्या मालकीच्या शेतात (गट क्र. ५७) पर्मिया कमल सांगळ (रा. आत्मज, नेवाजी वाटली फाम्या, मध्यप्रदेश; ह.मु. अर्थे बुद्रुक) हे कुटुंब पत्र्याच्या शेडजवळ बसले होते. त्यावेळी अचानक आलेल्या बिबट्याने आई-वडिलांसमोरच २ वर्षांच्या चिमुकल्या योगेशवर हल्ला चढवला व त्याला जबड्यात धरून अंधारात ओढून नेले.

**रात्रभर शोधमोहीम अन् सकाळी आढळले अवशेष**

घटनेची माहिती मिळताच उपवनसंरक्षक मोहन नाईकवाडी, विभागीय वन अधिकारी राजेंद्र सदगीर, वनपरिक्षेत्र अधिकारी कि. म. गिरवले, वनपाल, वनरक्षक आणि पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. थर्मल ड्रोन आणि दोन विशेष पथकांच्या माध्यमातून रात्रभर शोधमोहीम राबवण्यात आली. मात्र, परिसरात केळी, ऊस, पपई व तुरीचे उंच पीक असल्याने रात्री बालकाचा शोध लागू शकला नाही.१० सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजेच्या सुमारास घटनास्थळापासून ४०० ते ५०० मीटर अंतरावर तुरीच्या शेतात वन कर्मचाऱ्यांना बिबट्याचे पिल्लू तुरीतून उसाच्या शेतात जाताना दिसले. त्यानंतर परिसरात कसून शोध घेतला असता बालकाच्या शरीराचे काही अवशेष छिन्नविच्छिन्न अवस्थेत आढळून आले. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरे आणि ड्रोनचा वापरघटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन न्यायवैद्यक विभागाच्या समक्ष मृतदेहाचा पंचनामा करण्यात आला आहे. अर्थे बुद्रुक परिसरात बिबट्याची मादी व तिची पिल्ले वावरत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. शासन निर्णयानुसार मृत बालकाच्या कुटुंबाला भरघोस आर्थिक नुकसान भरपाई दिली जाईल, असे आश्वासन वनविभागातर्फे देण्यात आले आहे. दरम्यान, या नरभक्षक बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वनविभागाने परिसरात पिंजरे, ड्रोन आणि ट्रॅप कॅमेरे तैनात केले असून रात्रंदिवस गस्त सुरू केली आहे.

**वनविभागाचे नागरिकांना आवाहन :-**

रात्रीच्या वेळी नागरिकांनी विनाकारण घराबाहेर पडू नये. उघड्यावर झोपणे पूर्णपणे टाळावे. लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी आणि त्यांना एकटे सोडू नये.परिसरात बिबट्याचा वावर दिसल्यास त्वरित वनविभागाशी संपर्क साधावा.

## शालेय तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत शंकरराव चव्हाण विद्यालय अव्वल



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१०, नागपूर :** खापरखेडा येथील प्रकाशनगर वसाहत परिसरातील शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाने शालेय तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत १९ वर्षीय वयोगटातील मुलांच्या कबड्डी संघाने घवघवीत यश संपादन करून अव्वल स्थान प्राप्त केले.

क्रीडा संकुल सावनेर येथे संपन्न झालेल्या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या १९ वर्षीय वयोगटातील मुलांच्या संघाने अंतिम सामन्यात जिजामाता कनिष्ठ महाविद्यालय खापा कबड्डी संघाला पराजित करून स्पर्धेत अव्वल स्थान प्राप्त केले.

संयोग बावणे (कर्णधार), हर्षल अंजनकर, रणवीर उके,सूरज शिंदे, सिद्धांत मारबते, मयुर न्हाने,आदेश कांबळे, प्रिन्स जयस्वाल ह्या खेळाडूनी भाग घेतला असून क्रीडा प्रमुख प्रवीण साबळे व मार्गदर्शक सचिन कोरडे यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य गणेश चिखले, पर्यवेक्षक सुरेखा चिखले, चंदकांत गायकवाड सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी संघातील खेळाडूंचे अभिनंदन केले. शंकरराव चव्हाण विद्यालयाचा कबड्डी संघ कामठी तालुक्यातील आजनी येथे होणाऱ्या शालेय नागपूर जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत सावनेर तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.